पारनेर दर्शन

वर्ष १ अंक २८३, रविवार २८ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

रेटकार्डला पाय फुटल्याने एसपींचा थयथयाट!

■ पोलीस ठाण्यांच्या प्रभारींना अवैध व्यवसाय बंद करण्याचे आदेश ■ खा. नीलेश लंके यांच्या आंदोलनाचा इम्पॅक्ट

नगर : प्रतिनिधी

एलसीबीकडून वसूल करण्यात येणा-या हप्त्यांच्या रेटकार्डला पाऊल फुटून ते खा. नीलेश लंके यांच्या हाती लागल्याने पोलीस अधीक्षक राकेश ओला हे चांगलेच संतप्त झाल्याची माहीती असून एलसीबीची इत्यंभूत माहीती पुरविणाऱ्या कर्मचाऱ्यांना पाहून घेण्याचा इशारा देत त्यांनी चांगलाच थयथयाट केल्याचे समजते. दरम्यान, शुक्रवारी जिल्हयातील पोलीस ठाण्यांच्या प्रभारींच्या पार पडलेल्या बैठकीत त्या त्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अवैध व्यवसाय बंद करण्याचे आदेश ओला यांनी दिले आहेत.

शुक्रवारी पार पडलेल्या बैठकीत राकेश ओला यांनी पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील अवैध व्यवसाय सुरू असल्यास त्यांच्यावर कारवाई करावी. त्यासाठी विशेष मोहिम राबविण्यात यावी. स्थानिक गुन्हे शाखेनेनेही कारवाईची मोहिम सुरू करण्याचे आदेश ओला यांनी दिले. ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसाय सुरू असल्याचे आढळून येईल त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असा इशाराही ओला यांनी या बैठकीत दिला.

नगर पोलीस दलाच्या एलसीबी विभागातील भ्रष्टाचाराविरोधात खा. नीलेश लंके यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर चार दिवस उपोषण केले. या उपोषणादरम्यान दोन हजारांहून अधिक तक्रारींचा पाऊस पडला यावेळी खा. लंके यांनी एलसीबीविरोधात पुराव्यांसह आरोप केल्याने नगर पोलीसांची मोठी बदनामी झाली. त्यामुळेच ओला हे ॲक्शन मोडमध्ये आले आहेत.

एलसीबीचा स्वतंत्र आढावा

खासदार नीलेश लंके यांनी केलेल्या उपोषणाच्या पार्श्वभुमीवर ओला यांनी एलसीबीच्या कामाचाही स्वतंत्र आढावा घेतला. या शाखेने सहा महिन्यात खुनाचे सात, दरोडयाचे १२, दरोडयाची तयारी ८, जबरी चोरी १८, चेन स्नॅचिंग ३५ , घरफोडी ५०, चोरीचे ३९ गुन्हे उघड केले. आर्म ॲक्ट ११, गुटखा १७, वाळू १३, गोमांस ११ अशा एकूण २२२ कारवाया करण्यात आल्या. एलसीबीने विविध गुन्हयांमधील ३४५ आरोपींना अटक केली. तर ५ कोटी १५ लाख रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्याची माहीती यावेळी देण्यात आली.

अवैध व्यवसायांवरील कारवाया

जानेवारी ते जुन या सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये मागील वर्षीच्या सहा महिन्यांच्या तुलनेत अवैध व्यवसायांवर जास्त कारवाया करण्यात आल्या. त्यात जुगार अडडयांवर ७१०, अवैध दारू व्यवसायावर २ हजार ५२१, गांजा व इतर आंमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी १७३, आर्म ॲक्ट अंतर्गत गावठी कटटे बाळगल्याप्रकरणी २१, इतर हत्यारे बाळगल्याप्रकरणी ११० कारवाया करण्यात आल्याचे पोलीस अधीक्षक ओला यांनी सांगितले.

१४ गुन्हेगारांवर एमपीडीए अंतर्गत कारवाई प्रस्तावित

खा. लंके यांचे आंदोलन संपल्यानंतर राकेश ओला यांनी दुसऱ्याच दिवशी पोलीस ठाण्याच्या प्रभारींच्या बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत ओला यांनी पोलीस ठाणेनिहाय गुन्हयांच्या प्रलंबित तपासाचा तसेच कारवाईचा आढावा घेतला. चालू वर्षात १४ सराईत गुन्हेगारांविरोधात एमपीडीए अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्यात आली असून जिल्हयात दाखल होणाऱ्या गुन्हयांच्या प्रमाणात तपास पुर्ण करून गुन्हे निकाली काढण्याचे प्रमाणही वाढले असल्याचे ओला यांनी सांगितले.

घरफोडयांमध्ये वाढ, दुचाकी चोरी घटली

गेल्या सहा महिन्यात घरफोडीच्या ३९० घटना घडल्या. मागील वर्षीच्या तुलनेत घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. दुचाकी चोरीच्या गुन्हयांमध्येही मागील वर्षीच्या पहिल्या सहा महिन्यात २ हजार २४४ घटना घडल्या आहेत तर यावर्षी १ हजार ७६६ गुन्हे दाखल असून त्यात ४७८ ने घट झाली आहे. दरोडयाचे २३ गुन्हे दाखल असून ते सर्व उघडकीस येऊन त्यातील ९० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याची माहीती ओला यांनी दिली.

एलसीबीमध्ये अद्याप नियुक्त्या नाही

गेल्या आठवडयात शनिवारी जिल्हयातील ४६९ पोलीस कर्मचाऱ्यांच्या विनंती बदल्या करण्यात आल्या. विनंती बदल्यांचे ७५० अर्ज असून त्याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येणार आहे. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेतील रिक्त जागांवर अद्याप नियुक्त्या करण्यात आलेल्या नाहीत.

उद्धव ठाकरे हेच महाराष्ट्राला प्रगतीच्या वाटेवर नेतील

■ डॉ. श्रीकांत पठारे यांचा विश्वास ■ ठाकरे यांच्या वाढदिवसनिमित्त मशाल, शिवसंवाद यात्रा, भगवा सप्ताह

■ मा. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसनिमित्त मशाल, शिवसंवाद यात्रा व भगवा सप्ताहाचा विविध उपक्रमांनी शुभारंभ करण्यात आला.

पारनेर : प्रतिनिधी

राज्याचे कुटूंबप्रमुख म्हणून राज्याचे मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरे यांनी केलेल्या कामाचे सर्वच थरांतून कौतुक झाले असून आगामी विधानसभा निवडणूकीत शिवसेना सर्वाधिक जागा जिंकून उद्धव ठाकरे हे पुन्हा मुख्यमंत्रीपदी विराजमान होतील असे सांगतानाच ठाकरे हेच महाराष्ट्राला प्रगतीच्या वाटेवर घेउन जातील असा ठाम विश्वास शिवसेनेचे तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांनी व्यक्त केला.

ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पारनेर तालुक्यात मशाल व शिवसंवाद यात्रा तसेच भगवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून त्याचा शुभारंभ शनिवारी करण्यात आला. त्यानिमित्त तालुक्यात ठिकठिकाणी सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. ढवळपुरी, भाळवणी, पारनेर, सुपा, अळकुटी, रांधे, देसवडे, हिवरे कोरडा, निघोज, टाकळीढोकेश्वर येथे आरोग्य शिबिर, शालेय विद्यार्थ्यांना खाऊ वाटप, शालेय साहित्याचे वाटप, वृध्दाश्रमातील वृध्दांना किराणा वाटप तसेच वृक्षारोपण करून पर्यावरणाचा संदेश देण्यात आला.

यावेळी महिला आघाडी प्रमुख प्रियंका खिलारी, युवा सेना तालुकाप्रमुख अनिल शेटे, डॉ. भास्करराव शिरोळे, धनंजय निमसे, राजू शेख, पोपट चौधरी, विलास लोंढे, डॉ. कोमल भंडारी, सखाराम उजघरे, बाबा रेपाळे, आयुब शेख, संतोष साबळे, बाबासाहेब नऱ्हे, किसन सुपेकर, शुभम गोरडे, प्रकाश रोहोकले, नागेश नरसाळे, सुयोग टेकुडे, ज्ञानेश्वर औटी, बाळासाहेब भनगडे, राहुल मोरे, आदीनाथ कदम,मोहित जाधव, प्रशांत निंबाळकर, अक्षय फापाळे, संदीप आवारी, भाऊसाहेब टेकुडे,प्रमोद पठारे, डॉ. बाळासाहेब पठारे, संदीप कोरडे, शिवाजी दळवी, मोहन पवार, दत्ता टोणगे, किसन चौधरी, संतोष राकडे, दौलत सुपेकर, महेंद्र पांढरकर, सुभाष भोसले, संदीप भंडारी,शरद घोलप, शरद आवारी, संपत लामखडे, विठ्ठल जाधव आदी उपस्थित होते.

लोकसभेच्या मदतीचे परतफेड करा

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीचे उमेदवार खा. नीलेश लंके यांना मतदान घडवून आण्यासाठी पारनेर तालुक्यातील शिवसैनिकांनी अपार कष्ट घेतले. त्यामुळे आगामी विधानसभेच्या निवडणूकीत पारनेर मतदारसंघाची जागा शिवसेनेला देउन मतदारसंघावर पुन्हा भगवा फडकवावा आणि लोकसभेला केलेल्या मदतीची विधानसभा उमेदवारीच्या रूपाने परतफेड करावी अशा भावना ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सर्वसामान्य शिवसैनिकांनी व्यक्त केल्या.

टोल फ्री क्रमांकावर समस्या पाठवा

तालुकाप्रमुख डॉ. श्रीकांत पठारे यांच्या संकल्पनेतून ९४२१४८९७०५ हा टोल फ्री क्रमांक जाहिर करण्यात आला असून या क्रमांकावर तालुक्यातील नागरीकांच्या समस्या फोन, एसएमएस, व्हॉटस ॲप मेसेजद्वारे पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.कामाचे स्वरूप, निवेदन, फोटो, व्हिडीओ देखील पाठवावेत. आलेल्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी डॉ. पठारे हे स्वतः जातीने लक्ष घालणार आहेत.

नानांच्या विचारांचा तालुक्यात आजही प्रभाव

■ खासदार नीलेश लंके यांचे प्रतिपादन ■ मार्तंडराव पठारे नाना यांचा स्मृतीदिन

पारनेर : प्रतिनिधी

सर्वसामान्यांचे नेते म्हणून मार्तंडनाना पठारे यांची ओळख असणाऱ्या मार्तंडनाना पठारे यांच्या विचारांचा प्रभाव आजही तालुक्यात असल्याचे सांगतानाच गोरगरीब, कष्टकरी जनतेचे प्रश्न सोडविण्यात त्यांचा हातखंडा होता. मार्तंडनाना राजकारणातील आदर्श व्यक्तिमत्व होते असे प्रतिपादन खा. नीलेश लंके यांनी केले.

स्व. मार्तंडनाना पठारे यांच्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात खा. लंके हे बोलत होते. ते म्हणाले, तालुक्याच्या विकासात नानांचे मदत्वाचे योगदान राहिले. सर्वात जास्त शिक्षक तसेच त्यांच्या साईच्या बदल्या करण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. सामान्यांचे पोलीस ठाण्यातील प्रश्न सोडविण्यासाठी नाना लाल चौकातून थेट पोलीस ठाण्यात पायी जात. व त्यांना न्याय मिळवून देत. त्यांच्या शब्दाला मोठी किंमत होती. त्यांच्या विचाराचे राजकारण करणे ही काळाची गरज असल्याचे खा. लंके म्हणाले.

यावेळी बाबाजी तरटे, विश्वनाथ कोरडे, राहुल शिंदे, गणेश शेळके, विक्रमसिंह कळमकर, डॉ. श्रीकांत पठारे, गंगाराम बेलकर, संजय वाघमारे, रा.या. औटी, वसंत चेडे, अर्जुन भालेकर, चंद्रकांत चेडे, डॉ. बाळासाहेब कावरे, सचिन पठारे, शंकर नगरे, सचिन औटी, बाबाजी भंडारी, सखाराम औटी, पांडूरंग खोडदे, दत्तात्रेय गव्हाणे, युवराज पठारे, राम पठारे, रावसाहेब रोहकले, भाऊसाहेब खामकर, नाना लंके, भास्कर गव्हाणे, सोपान करकंडे, भाउसाहेब खोडदे, बाजीराव चिकणे, विष्णू चिकणे, समीर शेख यांच्यासह असंख्य मार्तंडनाना पठारे प्रेमी उपस्थित होते.

■ जि प चे मा. सदस्य स्व. मार्तंडनाना पठारे यांच्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात खासदार नीलेश लंके यांनी संवाद साधला.

अनेकांना रोजगार

पारनेर कारखान्याच्या उभारणीत नानांचा सिंहाचा वाटा होता. माझ्यासारख्या अनेक कामगारांना त्यांनी कामाला लावले. मा. मंत्री शंकरराव काळे यांच्या माध्यमातून रयत शिक्षण संस्थेत नानांनी अनेकांना नोकरीच्या संधी दिल्या. बांधकाम विभागातील मैल कामगार पदावरही अनेकांना त्यांनी रोजगार मिळवून दिला.

शिवाजी औटी, कामगार नेते

नानांचे विचार समाजात पोहचवावेत

नानांचे विचार समाजात पोहचविणे हीच त्यांना खरी श्रध्दांजली ठरेल. कुटूंब म्हणून आमची जबाबदारी निश्चित आहेत. मात्र त्यांच्या सहवासात राहिलेल्यांचीही ही जबाबदारी अधिक आहे. ते कुटूंबाचे कधीच नव्हते तर समाजाचे होते. कुटूंबासाठी ते कधी जगले नाही. अखेरच्या श्वासापर्यंत ते समाजासाठी झटल्याचे नानांचे चिरंजीव दिपक पठारे यांनी सांगितले.

तालुक्याची दिशा नाना ठरवायचे

तालुक्याला कोणत्या दिशेने न्यायचे हे नाना ठरवायचे. मा. आ. कै. कॉ. बाबासाहेब ठुबे यांना आमदार करण्यात त्यांचे योगदान होते. मा. आ. वसंतराव झावरे यांना ते धाकटया भावाने प्रेम देत. दादांना तालुक्याचे दहा वर्षे प्रतिनिधीत्व करण्याची संधी नानांमुळेच मिळाली.

अशोक सावंत
मा. राज्यमंत्री

साधी राहणी, श्रेष्ठ विचार

कौटुंबिक अथवा मोठ मोठे भांडण तंटे नानांच्या शब्दावर मिटत. राजकारणात विरोधातील नेतेही त्यांचे चांगले मित्र होते. साधी राहणी असूनही विचार श्रेष्ठ होते.वसंतदादा व आणि नानांची मैत्री घटट होती. नानांना मिळणारी उमेदवारी वसंतदादांना मिळाली अशी मैत्री पुन्हा होणे नाही.

सुजित झावरे, मा. जि.प. उपाध्यक्ष

अनंत कार्यकर्ते घडविले

नानांनी पारनेर येथे व्यवसाय उभा करण्यासाठी मोठी मदत केली.त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची मला संधी लाभली. माझ्यासारखे अनंत कार्यकर्ते त्यांनी घडविले.

काशिनाथ दाते. मा. सभापती

जमीन विकणे आहे... भाऊराव कऱ्हाडे यांची पोस्ट !

■ जमीन विकू नका, आपण सर्व मिळून मार्ग काढू
■ भाऊरावांना सिने चाहत्यांची भावनिक साद

शिरुर : सतीश डोंगरे

राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त निर्माते-दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांची जमीन विकणे आहे... अशी पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली आणि सिने जगतात एकच खळबळ उडाली. ख्वाडा, बबन आणि टीडीएम असे एका पाठोपाठ एक हीट चित्रपट देणारे भाऊराव मोठ्या अडचणीत आहेत असे या पोस्टवरून समजल्यानंतर चाहत्यांच्या काळजात धस्स झाले. भाऊराव जमीन विकू नका, आपण सर्व मिळून मार्ग काढू, अशी भावनिक साद चाहत्यांनी घातली आहे.गेल्याच महिन्यात भाऊराव यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीवर आधारित फकिरा चित्रपटाची घोषणा केली त्यानंतर संपूर्ण सिनेसृष्टीतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. सिने चाहते या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत असतानाच काल अचानक भाऊराव यांनी जमीन विकणे आहे... अशी पोस्ट सोशल उर्वरीत पान ३ वर

फॅशन | संसार | सौंदर्य
सखी

दागिन्यांचा विषय निघाला की चर्चेचा मोर्चा सहजच इतर देशांकडे वळतो. दरवर्षी कपडे, ॲक्सेसरीज यांच्यासोबत दागिन्यांचे ट्रेण्डसुद्धा जगभरात बदलत असतात. यंदाच्या जगभरातील दागिन्यांच्या ट्रेण्डवर एक नजर....

भारताबाहेरचे ट्रेण्ड्स!

स्टेटमेंट इअररिंग्स

गेल्या काही वर्षांपासून नेकपीसला जास्त महत्त्व दिलं गेलं होतं. आता मात्र फोकस इअररिंग्सवर आहे. मोठाले, लांब कानातले डूल यंदा आवर्जून पाहायला मिळतील. प्लास्टिक, थ्रीडी तंत्रज्ञान यामुळे दागिन्यांचं वजन काही प्रमाणात कमी झालं आहे. त्याचा परिणाम म्हणून ओव्हरसाइज कानातले यंदा न्यूयॉर्क आणि पॅरिसच्या रनवेवर पाहायला मिळाले. अर्थात यांच्यासोबतच मोती, रंगीत खडे, सोने, हिरे यांचा वापरही इअररिंग्समध्ये आवर्जून करण्यात आला होता. इअररिंग्समधील यंदाचा महत्त्वाचा बदल म्हणजे दोन्ही कानांतील समान इअररिंग्सना फाटा देत एकाच कानात इअररिंग घालायची किंवा दोन्ही कानात वेगवेगळे इअररिंग्स घालायची पद्धत यंदा रुजू झाली आहे. आपल्याकडे मागच्या वर्षी इअरकफचा ट्रेण्ड आला होता. एका किंवा दोन्ही कानांमध्ये संपूर्ण कानाच्या आकाराचं, नजरेत भरणारं इअरकफ घातलं जायचं. पण तेव्हा दुसऱ्या कानामध्ये छोटा खडा घातला जायचा. पण यंदा मात्र इअरकफसोबत दुसरा कान मोकळा सोडला जातोय. तसचं इअरकफचा आकारही वाढला आहे. सध्या दैनंदिन वापरातचं नाही तर पार्टी, समारंभाला जातानासुद्धा वेगवेगळे दागिने घालण्याऐवजी एकच नजरेत भरणारा दागिना घालण्याकडे तरुणाई पसंती देत आहे. हे दागिन्यांचा आकार वाढण्याचं मुख्य कारण आहे. याचबरोबर तुम्हाला दोन्ही कानांत डूल घालायचेच असतील तर दोन वेगवेगळे डूल घालायचा प्रयोगही यंदा केला गेलाय. तुमच्या ड्रेसमधील दोन मुख्य रंग निवडून (कॉन्ट्रास असतील तर उत्तम) त्या रंगाचे कानातले यात घातले जातात. यामध्ये दोन्ही कानांतल्यांचा आकार वेगळा असेल तरी चालू शकतं. पण सुरुवातीला प्रयोग करताना किमान एक घटक समान असू द्या. उदा. मूळ चौकोनी आकाराचे कानातले निवडून दोघांचे आकार छोटे-मोठे असू द्या. दोन्ही कानांतल्यांचा बेस रंग समान असू द्या. तसेच एक कुंदन आणि एक हिऱ्याचं डूल असं एकदम टोकाचे कानातले निवडून चालणार नाही. शक्यतो दोन्ही कानातले मोठे, केसांमध्ये न लपता पटकन नजरेत येणारे असू द्या. तुम्हाला पारंपरिक इअररिंग्स पसंत असतील तर कानाच्या आकारापेक्षा मोठे आणि भौमितिक आकारांचे इअररिंग्स वापरता येतील.

पारंपरिक मोटिफ्स आणि मोती

दागिन्यांमध्ये नक्षीकाम आणि मोटिफ्स कोणते वापरतो, याला अधिक महत्त्व आहे. पेझ्ली, फ्लोरल, मीनाकारी, भौमितिक, प्राणी-पक्ष्यांचे आकार असे कित्येक मोटिफ्स दागिन्यांमध्ये वापरले जातात. यंदा नवीन चिन्हे निवडण्याऐवजी पारंपरिक चिन्हांना डिझायनर्सनी पसंती दिली आहे. यामध्ये कित्येक धार्मिक चिन्हांचा, पुरातन वास्तूमधील चिन्हांचा प्रामुख्याने समावेश आहे. ख्रिश्चनांचा क्रॉस, इजिप्त, ग्रीक संस्कृतीतील चिन्हे, प्राण्यांचा आकार यांचा समावेश केला गेलाय. फ्लोरल आकारांवरसुद्धा ग्रीक, पर्शियन शिल्पकलेचा प्रभाव आवर्जून पाहायला मिळतो. यंदाच्या दागिन्यांमध्ये प्रामुख्याने नजरेत येणारा घटक म्हणजे मोती. मोठाले, शक्यतो सफेद मोती यंदा कित्येक डिझायनर्सनी दागिन्यांमध्ये वापरले आहेत. हिरे आणि इतर धातूंच्या तुलनेत मोत्यांचे दागिने कपडय़ांच्या वेगवेगळ्या रंगांवर खुलून दिसतात. तसेच पारंपरिक, फॉर्मल, पार्टीवेअर सगळ्याच लुकवर ते वापरता येतात. त्यामुळे मोत्यांचा वापर यंदा दागिन्यांमध्ये केला गेलाय. सफेद आणि क्रीम रंगाच्या मोतींसोबत रंगीत मोतीही यंदा वापरले गेले आहेत. यांच्यासोबतच रंगीत मिनरल्सचा वापरसुद्धा पेण्डंटमध्ये केला गेलाय. सोने, चांदी, प्लॅटिनम या खऱ्या धातूऐवजी प्लास्टिक, सोन्याचांदीचं पाणी चढवलेले धातू, लेदर, कापड यांचा वापरही दागिन्यांमध्ये केला गेलाय.

चोकर आणि नाजूक नेकपीस

यंदा इअररिंग्सवर अधिक लक्ष दिलं गेल्याने नेकपीस सिंपल ठेवण्याकडे बऱ्याच डिझायनर्सनी पसंती दिली आहे. विशेषतः ९०च्या दशकातील गळ्याभोवती घट्ट बसणारा चोकर पुन्हा पाहायला मिळतो आहे. पण यंदा त्याचं रूपं विस्तारलं आहे. पारंपरिक लेदर किंवा प्लास्टिकच्या पट्ट्याच्या चोकरसोबत धातू, मणी यांचा वापर करून केलेले मोठाले चोकरसुद्धा लक्ष वेधून घेत आहेत. तुम्हाला गळाबंद चोकर नको असेल तर नाजूक पेण्डण्ट किंवा नेकपीसचा पर्यायसुद्धा डिझायनर्सनी दिला आहे. मध्यम आकाराच्या खड्यांची नाजूक माळ किंवा नाजूक सरीसोबत मोठाले पेण्डण्ट हे प्रकार यंदा आवर्जून पाहायला मिळतील. अर्थात हे पेण्डण्टसुद्धा इअररिंग्सप्रमाणेच आकाराने मोठे आहेत. कानातून गळ्याभोवती जाणारा नेकपीस, स्कार्फप्रमाणे गळ्यामागून येत समोर मोकळा सोडलेला नेकपीस असे कित्येक प्रयोग डिझायनर्सनी यंदा केले आहेत.

आर्मकफ आणि अंगठ्या

मघाशी म्हटल्याप्रमाणे अंगभर दागिने घालण्यापेक्षा एक नजरेत भरणारा दागिना घालण्याकडे डिझायनर्सचा यंदा कल आहे. त्यातीलच एक प्रकार म्हणजे आर्मकफ. थोडक्यात सांगायचं झाल्यास अंगठी आणि कड्याला जोडणाऱ्या हातफुलाचं उदाहरण घेता येईल. पण इअररिंग्सप्रमाणेच या आर्मकफचा आकार मोठा आहे. फ्लोरल आकारांसोबत दोरीची नॉट, वेल, भौमितिक आकार या विविध आकारांचा वापर यात केला आहे. यावर्षी खडे, मोती, माणिक यांच्या मोठय़ाला अंगठय़ासुद्धा नक्की पाहायला मिळतील. पण हल्ली एकच अंगठी घालून भागत नाही. सगळ्या बोटांमध्ये वेगवेगळ्या आकाराच्या अंगठ्या घालायची पद्धत आता रुजू झाली आहे. अगदी एकाच बोटात दोन-तीन अंगठ्याही घातल्या जातात. त्यानुसार नाजूक अंगठ्याही पाहायला मिळतात. काही वर्षांपूर्वीपर्यंत परदेशातील हे ट्रेण्ड्स भारतात येईपर्यंत दोन-तीन वर्षे जायची. पण हल्ली मात्र जागतिक ट्रेण्ड्स भारतात लगेचच पाहायला मिळतात. त्यामुळे हे ट्रेण्ड्स न्यूयॉर्क, पॅरिसमध्ये दिसून आले असले, तरी भारतातसुद्धा त्यांची चाहूल लागलेली आहे.

दागिन्यांचं खरं सौंदर्य पारंपरिक रूपात दिसून येत असलं तरी आता काळानुरूप दागिन्यांमध्येही बदल होताना दिसताहेत. आधुनिक पद्धतीचे, पण पारंपरिक वलय असलेले विविध स्वरूपातील दागिने तरुणींसाठी पर्वणी ठरत आहेत...

बहुढंगी लखलखते दागिने...

ट्रेनमध्ये हँगरवर लटकवलेले कानातले डूल, पैंजण, कडे असोत किंवा फॅशन स्ट्रीटवरच्या दुकानात मोलभाव करून घेतलेले स्टेटमेंट नेकपीस, डिझायनरचं खास हटके कलेक्शन असो किंवा सोन्याच्या दुकानात डोळे दिपवून टाकणारे दागिने... स्वरूप काहीही असो दागिने स्त्रीच्या मनाला भुरळ घालणार नाहीत, असं होणं शक्य नाही. कपडे आणि दागिन्यांची हौस फिटत नाही असं म्हणतात ते उगाच नाही. पण, तरीही दागिन्यांवरचं तिचं प्रेम किंचित जास्त असतं. त्याला कारणच तसं असतं म्हणा ना. एखादं दिवशी काहीच पर्याय नाही म्हणून जुना, साधासा टॉप घालावा लागला, तर त्यासोबत छानसं कानातलं घातलं की दिवस मस्त जातो, मैत्रिणीला वाढदिवसाला गिफ्ट देताना कपड्यांच्या साईझवरून गोंधळ होऊ शकतो पण, नेकपीस, कड्याबद्दल हा गोंधळ कधीच होऊ शकत नाही. जुने कपडे काळानुसार उसवले जातात, तोकडे पडतात पण, दागिने तुमची साथ क्वचित प्रसंगीच सोडतात. दागिन्यांचं महत्त्व कवींनाही पटलं आहे. त्यामुळेच तर त्यांनी झुमक्यापासून नथनीपर्यंत, बांगड्यांपासून पैंजणांपर्यंत कित्येक दागिन्यांवर कविता-गाणी करून ठेवली आहेत, नाही का..!

आजची तरुणीसुद्धा कितीही मॉडर्न झाली असली तरी तिची दागिन्यांची आवड काही संपली नाही. त्यामुळेच तर आज तिच्यासाठी तिच्या मागणीनुसार दागिन्यांची एक मोठी बाजारपेठ उभी ठाकली आहे. त्यात पारंपरिकतेपासून आधुनिक पद्धतीच्या दागिन्यांपर्यंत, सोन्यापासून जडाऊ, हिरे कुंदनपर्यंत अनेक पर्याय तिच्यासमोर आहेत. अगदी आता-आतापर्यंत केवळ लग्न ठरल्यावर सोन्याच्या दुकानात पाय ठेवणारी तरुणी पहिला पगार, प्रमोशन, तर कधी सहज मनाला आलं म्हणून हिरे, सोन्याचे दागिने खरेदी करू लागली आहे. पण, म्हणूनच हे दागिने कडीकुलपात बंद करून फक्त सणांच्या वेळी काढण्याऐवजी रोज ऑफिस, पार्टी, गेटटूगेदरमध्ये मिरवणे ती अधिक पसंत करते. नवीन इंटर्न म्हणून ऑफिसला रुजू झाल्यावर फॅशन स्ट्रीटवर तिने केलेल्या बार्गेनचे किस्से रंगवणारी ती दोन-एक वर्षांत किती कॅरेटचा हिरा किती लकाकतो याच्या गप्पा रंगवायला लागते. तेव्हा तिच्यासोबत तिचे दागिनेसुद्धा कात टाकू लागले आहेत हे लक्षात यायला लागतं...

इमिटेशन ज्वेलरीचा प्रभाव

तरुणींवर असलेला इमिटेशन किंवा फॅशन ज्वेलरीचा प्रभाव नाकारता येणार नाही. त्यामुळे सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीमध्ये इमिटेशन ज्वेलरीमधील मोटिफ, डिझाइन वापरलं जाऊ लागलं आहे. इमिटेशन ज्वेलरीच्या स्टाइलचे हत्ती, वाघ, सिंह असे विविध मोटिफ, झुंबराकृती, एसिमेट्रिकल आकार, पठडीच्या रंगांपेक्षा वेगळे रंग असे अनेक गुण पारंपरिक सोन्याच्या आणि हिऱ्याच्या जडणघडणीत वापरत येत आहेत. हत्तीच्या छबी वापरून अंगठ्या, पेंडेंट्स हल्ली अनेक ज्वेलर्सकडून बाजारात आणली जात आहेत.

अंगठ्यांना पहिली पसंती

कित्येकदा तरुणी त्यांच्या साठवलेल्या पैशातून अंगठी घेण्यास पसंती देतात. तसंच हल्ली लग्नानंतर मंगळसूत्र रोज वापरण्यापेक्षा सणाच्या किंवा कार्यक्रमाच्या दिवशी कपाटाबाहेर काढलं जातं. त्याऐवजी तरुणी साखरपुड्याची अंगठी घालण्यास पसंती देतात. त्यामुळे अशा वेळी आपली अंगठी सुंदर आणि चारचौघांत उठून दिसावी याकडे भर दिला जातो. म्हणून गेल्या दोन वर्षांत अंगठय़ांच्या डिझाइन्समध्ये भरपूर विविधता पाहायला मिळाली. यामध्ये अंगठीचा रंग, आकार, साइज यामध्ये प्रयोग करण्यात आले. सध्या थ्रीडी स्टाइल आणि दोन बोटांत घालायच्या अंगठीला पसंती मिळत आहे. प्लॅटिनमच्या अंगठ्या तर साखरपुड्यासाठी पहिली पसंती असते.

डिटॅचेबल ज्वेलरी

बाजारात 'मल्टी युझ' ज्वेलरी, 'डिटॅचेबल ज्वेलरी' अशा विविध नावांनी या दागिन्यांना संबोधले जाते. मध्यंतरी दागिन्यांच्या जाहिरातींमध्ये मॉडेलच्या केसांची छानपैकी हेअरस्टाइल करून त्यात हिरे, जडाऊचे हार खोवले जायचे. जेणेकरून हाराला हेडपीसचा लुक येत असे. खास समारंभाला आवर्जून पार्लरला जाऊन तयार होणाऱ्या तरुणी हाराचा असा वापर नक्कीच करून पाहतात. यामुळे ड्रेसचा गळा हारामुळे लपला न जाता फोकसमध्ये येतो. लुकला नवेपणाही मिळतो.

सोन्यातही मिक्स मॅच

पूर्वी सोन्याचा हार घेताना कानातले डूल त्यासोबतच यायचे. बांगड्याही हाराला साजेशा घेतल्या जायच्या. जेणेकरून दागिन्यांचा 'सेट' बनत असे. पण हल्ली वेगवेगळ्या सेटमधील दागिने मिक्स मॅच करून घालण्याचा ट्रेंड सोन्याच्या दागिन्यांमध्येसुद्धा रुजू होत आहे. 'तरुणी हल्ली कानातले डूल, हार, बांगडय़ा असं वेगवेगळं डिझाइन आणि गरजेनुसार वेगवेगळं खरेदी करतात. मग समारंभानुसार एक किंवा अनेक दागिने घातले जातात. यामुळे त्यांना निवडक दागिन्यांतही पर्याय मिळतो. सणाच्या दिवशी साडी ते पार्टीसाठी गाऊनपर्यंत आजची तरुणी प्रसंगानुसार कपड्यांची निवड करते. त्यामुळे साडीसोबत खुलणारे कानातले हिऱ्याचे डूल गाऊनसोबत पण उठून दिसतील, याची काळजी ती खरेदी करताना घेते.

फुलाफुलांची मोहक दुनिया...

- कोणताही कपडा नजरेत भरला की त्यावर फुलांची डिझाईन आहे का याची लगेचच विचारणा होते. विविध रंग आणि आकारांच्या देखण्या डिझाईन्स लक्ष वेधून घेतात. फ्लोरल म्हणजेच फुलांच्या डिझाईन्स, पॅटर्न्सना दागिने आणि कपड्यांमधून कधीच मरण नव्हते. पण, यंदाच्या सीझनमध्ये स्त्रियांचे फुलांवरचे प्रेम किंचित जास्तच झालंय. त्यामुळे रॅम्पवर कपडे आणि दागिन्यांमधील फ्लोरल डिझाईन्स हा यंदाचा सर्वात मोठा ट्रेंड आहे. फुलाफुलांची मोहक दुनिया आता ज्वेलरीमध्येही बघायला मिळेल.
- 'फ्लोरल आणि टेम्पल डिझाईन्स या दागिन्यांच्या बाबतीत एव्हरग्रीन असतात यात वाद नाही. पण, यंदा फ्लोरल डिझाईन्सचा झालेला वापर थक्क करणारा आहे. हे प्रमाण इतकं वाढलं की, 'फ्लोरल ज्वेलरी' नावाची नवी संज्ञा जन्माला आली. यात फुलांचे डिझाईन असलेले नेकलेस, कानातले डूल, बांगड्या असे पारंपरिक प्रकार तर आहेतच. पण, हातफूल, चोटी (केसांच्या वेणीवरचा हेडपीस) यांसारखे वापरातून मागे पडलेले जुने दागिन्यांचे प्रकार परत आले आहेत.
- कित्येक बड्या बॉलीवूड सेलेब्रिटीजनी या फ्लोरल ज्वेलरी मिरवल्या आहेत. या फ्लोरल डिझाईनला अजूनच खुलवण्याचं काम केलं आहे ते दागिन्यांना दिल्या जाणाऱ्या अनेक पदरी डिझाईनने. मागच्या वर्षीपासून थ्रीडी डिझाईन्सचा ट्रेंड दागिन्यांमध्ये रुजू झाला आहे. यामुळे दागिन्यातील फुलांमधील प्रत्येक पाकळी उलगडलेली आणि त्यातील बारीक नक्षीकाम पाहायला मिळतं. पार्टीसाठी असं फुलाचं डिझाईन असलेलं एखादं ओव्हरसाईझ कानातलं सहज घालता येतं. ते छान इंडो-वेस्टर्न, क्लासी लुक देतं. सणासमारंभाला त्यासोबत एखादा नेकपीस किंवा कडे घालून पारंपरिक लुकही मिळू शकतो. याखेरीज यंदा सिम्पल आणि सुटसुटीत डिझाईन्सवर जास्त भर दिला गेला आहे. दागिन्यांतील मुख्य मोटीफ किंवा खडा फोकसमध्ये येईल याची काळजी डिझायनर्स घेऊ लागले आहेत. त्यामुळे दागिन्यांना उठाव मिळतोच, पण बदलत्या काळानुसार डिझाईन जुनी वाटत नाही.

एकच दागिना, वापर वेगवेगळ्या पद्धतीने...



फॅशन इंडस्ट्रीमध्ये असंख्य प्रयोग होत असतात. त्याचा अनुभव घेता येतो तो फॅशन स्ट्रीट किंवा तत्सम शॉपिंगसाठी असलेल्या लोकप्रिय ठिकाणी. हे प्रयोग बघून तरुण मुली घरच्या घरीसुद्धा त्याचं अनुकरण करतात. केवळ कपड्यांच्या बाबतीतच हे अनुकरण न करता आता त्यांनी मोर्चा वळवलाय तो ज्वेलरीकडे. कपड्यांमध्ये जसं एकच स्टोल किंवा स्कार्फ वेगवेगळ्या पद्धतीने घेतला जाऊ शकतो तसं दागिन्यांमध्ये करता येतं, याचं प्रात्याक्षिक तरुण मुली करत असतात. याचा अंदाज घेऊनच डिझायनर्सनेही उत्तम संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. एकच दागिना आता वेगवेगळ्या स्टाइल्समध्ये वापरता येईल. दिवसागणिक वाढती सोन्याची किंमत भारतीयांच्या मनातील सोन्यावरचे प्रेम कमी करू शकत नाही, हे खरं आहेच. पण, एकदा विकत घेतलेला दागिना जास्तीत जास्त कसा वापरता येईल हा प्रयत्न स्त्री करतच असते. कित्येकदा लग्नात केलेले दागिने इतके मोठे असतात, की ते छोट्या-छोट्या कार्यक्रमांना घालता येत नाहीत, तर कधी तेच तेच दागिने घालून कंटाळा येतो, मग ते मोडून नवीन दागिने करायचा घाट घातला जातो. ही गैरसोय टाळण्यासाठी डिझायनर्स एकच दागिना वेगवेगळ्या पद्धतीने कसा वापरता येईल याचा विचार करू लागले आहेत. एका कलेक्शनमधील मुख्य नेकलेसपासून अलग करता येणार पेंडंट एखाद्या चेनमध्ये घालून वेगळं घालता येऊ शकतं. त्यांच्याच 'प्लॅटर' कलेक्शनमध्ये वेगवेगळ्या रंगाच्या खड्यांचे पर्याय असलेली अंगठी देण्यात आली आहे. जेणेकरून एक अंगठी तीसहून अधिक पद्धतीने वापरता येते. तुमच्या ड्रेसला मॅच होणारी अंगठी यामुळे बदलता येते. गळ्यातील नाजूक हिऱ्यांची सर वेगळी केल्यास मांगटिका किंवा ब्रेसलेट म्हणून वापरता येईल. बाजूबंद किंवा अँकलेट म्हणून वापरता येणारा कडा असे प्रयोग यामध्ये केले जात आहेत. जेणेकरून दागिन्यांचा वापर वाढवता येणं शक्य होईल.

स्टाइल आधुनिक, टच पारंपरिक...

तसं म्हणायला सोन्याच्या दागिन्यांच्या बाबतीतही स्त्रियांना पूर्वीपासून एखाद-दुसरी डिझाइन बघून भागायचं नाहीच. त्यांना पर्याय लागायचेच. त्यात पुरुषांप्रमाणे 'दुकानात जाऊन काही विकत न घेता बाहेर येणं विचित्र दिसतं', याबद्दल त्यांना फारसं कधीच काही वाटलं नाही. उलट जुन्याकाळी दागिन्यांचं गाठोडं घरी घेऊन येणाऱ्या सराफालासुद्धा 'माझ्या माहेरच्या सराफाच्या दागिन्यांची तोड नाही हो याला' हा टोमणा चुकत नसे. पण आजच्या घडीला केवळ फॅशन ज्वेलरी आणि इमिटेशन दागिन्यांइतकीच सोने, हिऱ्याची बाजारपेठ विस्तारू पाहात आहे. कारण आजची तरुणी सोन्याचे दागिने केवळ लग्नासाठी किंवा सणांसाठी वापरण्याऐवजी रोज वापरण्यास पसंती देऊ लागली आहे. अर्थात प्रत्येक मुलीसाठी तिचं 'लग्न' हा अजूनही तितकाच महत्त्वाचा मुद्दा आहे आणि त्यावेळी खास बनविल्या जाणाऱ्या दागिन्यांचे महत्त्वही तितकंच आहे. पण असं असताना हे दागिने लग्नानंतर कितीदा आणि किती वेगवेगळ्या प्रकारे वापरता येतील, याचं गणितसुद्धा ती करत असते. नेमकी हीच बाब डिझायनर्सनी अचूक हेरली आहे आणि त्यामुळेच तेही आता एकच दागिना वेगवेगळ्या पद्धतीने वापरता येईल अशा प्रकारचे डिझाइन्स बाजारात आणण्यास सुरुवात केली आहे. तसेच नेहमीच्या दागिन्यांच्या प्रकारांपेक्षा काही नवीन प्रकार आणण्याचे प्रयत्नही डिझायनर्सकडून करण्यात येत आहेत. पिवळं सोनं आणि सफेद हिरा यापलीकडे व्हाइट गोल्ड, रोज गोल्ड, अँटिक गोल्ड तसेच प्लॅटीनम वापरलं जाऊ लागलं आहे. कुंदन, जडावू तसेच गोल, चौकोन, त्रिकोणी, आयताकार किंवा ओव्हल अशा विविध आकाराचे, रंगांचे खडेसुद्धा सध्या दागिन्यांमध्ये वापरले जात आहेत. मीनाकारी नक्षी, जाळी डिझाइन सध्या ट्रेंडमध्ये आहे. मंदिरांवरचं नक्षीकाम तर डिझायनर्सना दिवसेंदिवस आकर्षित करत आहे. त्यामुळे पर्याय भरपूर वाढले आहेत. आधुनिक स्टाइलचे पण पारंपरिक टच असलेले प्रयोगशील दागिन्यांचा आनंद घेता येईल.

बॉडी ज्वेलरी... नवा ट्रेंड

यंदाचा सर्वात वेगळा ज्वेलरी ट्रेंड पाहायला मिळाला तो म्हणजे 'बॉडी ज्वेलरी.' हा नवा ट्रेंड तरुणींमध्ये हळूहळू

रुजू लागलाय. एरवी खांद्यावरून रुळणारा पदर, दुपट्टा असं वर्णन केलं जायचं. पण आता हे वर्णन दागिन्यांबद्दल होण्यास सुरुवात झाली तर आश्चर्य वाटायला नको. नेकपीसला जोडून येणाऱ्या, खांद्यावरून हातावर रुळणाऱ्या मोत्यांच्या किंवा खड्यांच्या सरी, मनगटावरील कडा आणि बोटातील अंगठ्यांना जोडणारी हातफुलाची सर, कानातल्या डुलाच्या मागून हळूच केसांना भेटणाऱ्या बारीक सरी, मांगटिका किंवा हेडपीसला पदर, केसात डुलणाऱ्या बारीक सरी हे या पद्धतीच्या ज्वेलरीचे काही प्रकार आहेत. बेली नृत्य करणाऱ्या मुलींच्या ब्लाऊजला जोडलेल्या आणि पोटापर्यंत लोंबकळणाऱ्या माळा असतात. या नृत्याचा मुख्य फोकस नृत्यांगनांच्या पोटाकडे असल्यामुळे या नृत्य सादर करताना, त्या माळांमुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधले जाते. मध्यंतरी गळा, हात फोकसमध्ये येतील अशा प्रकारे माळा लावलेले टॉप, कुर्ते बाजारात आले होते. आता ही जागा दागिन्यांनी घेतली आहे. अशा प्रकारच्या पदरीकरणाने त्या अवयवाचे सौंदर्य खुलते. सध्या इमिटेशन ज्वेलरीमध्ये या प्रकारांना असलेली मागणी पाहता सोन्याच्या दागिन्यांमध्येही हे प्रयोग करण्यात येत आहेत. अर्थात स्त्रियांना दागिन्यांबद्दल कुतूहल आणि प्रेम आहे, तोपर्यंत हे प्रयोग होत राहणार. त्यामुळे ही लखलखती दुनिया कायम तेवत राहणार, हे नक्की.

शॉर्ट न्यूज

श्रीगोंद्यातील सांगवी दुमाला येथे घरफोडी

■ **श्रीगोंदा :** तालुक्यातील सांगवी दुमाला परिसरात राहणारे साहेबराव एकनाथ नलगे यांच्या घराच्या किचनचा दरवाजा अज्ञात चोरटयांनी तोडून घरात प्रवेश करून बेडरूम मधील कपाटात उचकापाचक करत कपाटातील सुमारे साडेपाच लाख रुपयांची रोख रक्कम आणि साडे सोळा तोळे सोन्याच्या दागिन्याची घरफोडी केली. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे, पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर भोसले यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करत उपनिरीक्षक समीर अभंग आणि कर्मचाऱ्यांना पुढील तपासाच्या सूचना दिल्या.

मोबाईल हँडसेट चोरी करणारा गजाआड

■ **केडगाव :** मोबाईल हँडसेट चोरी करणाऱ्या आरोपीला कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेतले. अजय बोल्या चव्हाण (वय ३६, रा. दूधसागर सोसायटी, केडगाव, नगर) असे जेरबंद आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून चोरीचे आठ मोबाईल पोलिसांनी हस्तगत केले. कोतवाली पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रताप दराडे यांना माहिती मिळाली केडगावमधील दूधसागर सोसायटीत राहणाऱ्या अजय चव्हाणकडे चोरीचा मोबाईल आहे. त्यानुसार कोतवाली पोलिसांच्या पथकाने अजय चव्हाणच्या घरावर छापा टाकत त्याला ताब्यात घेतले.

भेदभाव न करता विकासकामे केली

■ **पाथर्डी :** गेली दहा वर्षांपासून आमदार असताना मी कधीही भेदभाव न करता शेवगाव व पाथर्डी या दोन्हीही तालुक्यात विकासाची समान कामे करण्याचा सातत्त्याने प्रयत्न केला. मतदारसंघाचा जेवढा विकास करता येईल, तेवढा करण्याचा मी प्रयत्न केला असल्याचे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले. तालुक्यातील मुंगी, दहिगाव- शे, बोधेगावसह सोनविहीर ते कांबी या मार्गाच्या कामासाठी १३ कोटी ६० लाख रुपये निधीच्या विविध कामाचा भूमिपूजन समारंभ आ. राजळे यांचे हस्ते झाला. यावेळी आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

शेवगाव शहरात घाणीचे साम्राज्य

■ **शेवगाव :** शहरात ठिकठिकाणी असलेल्या घाणीच्या साम्राज्यामुळे शहर बकाल होत असल्याचे दिसून येत असून, मुख्य बाजारपेठेतील रस्ते तसेच नागरी वस्तीतील परिसर, ठिकठिकाणच्या मोकळ्या जागांनी गटाराचे रूप धारण केले आहे. अनेक ठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांना येण्या जाण्यासाठी देखील मोठा त्रास सहन करावा लागतो आहे. येत्या आठ दिवसांत स्वच्छतेबाबत नगरपरिषदेने सुधारणा न केल्यास नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांच्य कार्यालयात बेमुदत ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा गणेश रांधवणे यांनी पत्राद्वारे नगरपरिषद प्रशासनाला दिला आहे.

कांद्याच्या आवकेत वाढ; भाव स्थिर

■ **नेवासा :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार घोडेगाव येथील कांदा मार्केटमध्ये कांद्याची ५९ हजार २३५ गोण्या आवक झाली. सोमवारच्या तुलनेत १५ हजार गोण्यांची आवकेत वाढ तर ३००० रुपयांपर्यंत भाव मिळाला. एक-दोन लॉटला २९०० ते ३००० रुपयांचा भाव मिळाला. मोठा कांदा २६०० ते २८०० रुपये, मुक्कल भारी २५०० ते २७०० रुपये, गोल्टा २३०० ते २६०० रुपये, गोल्टी २००० ते २४०० रुपये तर हलक्या डॅमेज व जोड कांद्याला १००० ते १४०० रुपये प्रतिक्विंटलचा भाव मिळाला.

महाविकास आघाडीचा ढोंगीपणा उघड करण्याची हिच संधी

मंत्री राधाकृष्ण विखे यांचे प्रतिपादन

राहुरी : प्रतिनिधी

लोकसभा निवडणूकीत झालेल्या चुका पुन्हा होवू देवू नका, स्वत:च्या गावापासून काम सुरु करा. येणा-या काळात विरोधकांच्या नकारात्मक प्रचाराला तुम्हाला तेवढ्याच ताकदीने उत्तर देण्याचे काम करायचे आहे. विरोधकांकडे कुठलेही भांडवल आता राहीलेले नाही. महाविकास आघाडीचा ढोंगीपणा उघड करण्याची हीच संधी आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचे मोठे काम आपल्याकडे आहे. पुढील साठ दिवसात प्रत्येक गावापर्यंत योजना पोहोचविण्याचे काम संघटीतपणे करा, विधानसभा निवडणूकीत महायुतीलाच यश मिळेल असा विश्वास महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने जिल्ह्यातील पदाधिकारी, बुथप्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख यांची एकत्रित बैठक राहुरी येथे संपन्न झाली. या बैठकीला प्रदेश महामंत्री विजयराव चौधरी, संघटन मंत्री रवी अनासपुरे, जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले, डॉ.सुजय विखे पाटील, आ.मोणीका राजळे, वैभव पिचड, भाजपाचे जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे, दिलीप भालसिंग, शहर जिल्हाध्यक्ष ॲड.अभय आगरकर, महिला जिल्हाध्यक्षा अर्चना थोरात, कांचन मांढरे, जेष्ठ नेते सुभाष पाटील, नानासाहेब पवार, नितीन दिनकर, अरुण मुंढे, सत्यजीत कदम, बाबासाहेब वाकळे, भैय्या गंधे आदी याप्रसंगी उपस्थित होते.

आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील म्हणाले की, लोकसभेत पराभव स्विकारावा लागला असला तरी, देशाच्या पंतप्रधान पदी नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा विराजमान झाले. याचा सर्वांना अभिमान आहे. लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीने केलेल्या नकारात्मक प्रवासाला आपण उत्तर देण्यास कमी पडलो. ही चुक पुन्हा होवू द्यायची नसेल तर, केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना प्रभावीपणे प्रत्येक गावामध्ये पोहोचवा. सोशल मिडीयावर कोन काय चर्चा करते यापेक्षा या योजनांचीच माहीती लोकांपर्यंत पोहोचविली तर, विरोधकांच्या नकारात्मक प्रचाराला ते प्रभावी उत्तर होवू शकेल असे ना.विखे पाटील यांनी ठणकावून सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात या राज्यासाठी विविध प्रकारची मदत झाली. सहकारी साखर कारखान्यांचा आयकराचा बोजा मोदी सरकारमुळे कमी झाला. इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहनही केंद्र सरकारमुळे मिळाले मात्र दहा वर्षे केंद्रात कृषि मंत्री राहूनही या राज्याच्या हिताचे एकही काम महाविकास आघाडीच्या नेत्यांना करता आले नाही. नुकत्याच सादर झालेल्या केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पातही युवक, महिला, आदिवासी यांच्याकरीता मोठ्या निधीची तरतुद करुन, सर्वच समाज घटकांना न्याय देण्याची भूमिका घेतली गेली असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील महायुती सरकारनेही महिलांसाठी लाडकी बहीण योजनेपासून ते शेतक-यांना मोफत वीज देण्यापर्यंत योजना जाहीर केल्या आहेत. कौशल्य विकासातून युवकांनाही रोजगाराच्या संधी निर्माण करुन दिल्या आहेत. महायुती सरकारमुळेच जिल्ह्याच्या विकासाला गती मिळत असून, तीन औद्योगिक वसाहती सुरु होण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. आपले हित कशात आहे, हे मतदारांना समजावून सांगण्याची जबाबदारी आता पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची आहे. महाविकास आघाडीचा ढोंगीपणा उघड करण्याची हीच संधी असल्याची त्यांनी सांगितले.

डॉ.सुजय विखे पाटील म्हणाले की, विधानसभा निवडणूका जिंकायच्या असतील तर, सर्वांना मोठे मन ठेवावे लागेल. राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणण्यासाठी प्रत्येक आमदारा आपला महत्वाचा आहे. लोकसभा निवडणूकीत केवळ अपप्रचार झाला. मागील पाच वर्षात केलेला विकास अवघ्या दोन महिन्यात कुठे वाहून गेला हेही समजले नाही. सत्ता आली तरच कार्यकर्ते जिवंत राहतील यासाठी आपला लोकप्रतिनिधी महत्वाचा आहे. महायुती सरकार आले तरच सामान्य माणसाला न्याय मिळेल, विकासाची कामे मार्गी लागतील, कोन काय भाषणबाजी करतयं याला माझ्या दृष्टीने महत्व नाही, मात्र कार्यकर्त्यांना दमबाजीची भाषा झालीच तर जशासतसे उत्तर देण्यास मागेपुढे पाहू नका. तुमच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे असे त्यांनी कार्यकर्त्यांना आश्वासित केले.

महामंत्री विजय चौधरी यांनी महायुती सरकारमुळेच मराठा समाजाला आरक्षण मिळाले. मात्र केवळ विरोधी बाजू पुढे आणून सरकारला बदनाम करणारे चार वेळा मुख्यमंत्री होते, त्यांना मराठा समाजाला न्याय देता आला नाही. लोकसभा निवडणूकीत धार्मिक तेढ निर्माण करुन, महाविकास आघाडीने विजय मिळविला असला तरी, विधानसभा निवडणूकीत नियोजनबध्द पध्दतीने आपल्याला सामोरे जावे लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी शिवाजीराव कर्डीले, आ.मोणीका राजळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कारगील विजय दिनानिमित्ताने शहिद जवानांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

सिताबाई थिटे डी. फार्मसी महाविद्यालयास उत्तम श्रेणी प्रदान

शिक्षण तंत्र मंडळाच्या बाह्य संस्थेकडून सर्वेक्षण

शिरूर : प्रतिनिधी

श्री.छत्रपती संभाजी शिक्षण संस्थेच्या सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी (पॉली), शिरूर या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई मार्फत करण्यात आलेल्या बाह्य संस्था सर्वेक्षणमध्ये उत्तम श्रेणी प्रदान करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शहा यांनी दिली

सदर सर्वेक्षण हे मंडळामार्फत नेमणूक केलेल्या शैक्षणिक देखरेख समितीच्या पथकाद्वारे करण्यात येते. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या शैक्षणिक देखरेख समितीच्या पथकाने महाविद्यालयास भेट देऊन शैक्षणिक कामकाज,पायाभूत सुविधा ,ग्रंथालय,

प्रयोगशाळा, संगणक कक्ष, महाविद्यालयाचा निकाल, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी घेतलेले उपक्रम, शिक्षक वर्ग , मुलींचे वसतिगृह यांची पाहणी व छाननी करून सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी उत्तम श्रेणी प्रदान केली आहे

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, माजी गृहमंत्री स्व.बापूसाहेब थिटे यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या श्री छत्रपती संभाजी शिक्षण संस्थेचे सिताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी (पॉली), शिरूर महाविद्यालयाला फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या सर्वोच्च केंद्रीय संस्थेची व तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांची मान्यता आहे. या यशामध्ये संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र थिटे , सचिव धनंजय थिटे, संचालक डॉ. हर्षवर्धन थिटे ,सर्व पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयाचे आजी व माजी विद्यार्थी तसेच पालक वर्ग यांचे मोठे योगदान असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शहा यांनी सांगितले

(पान १ वरुन)

जमीन विकणे आहे... भाऊराव कऱ्हाडे यांची पोस्ट !

मीडियावर शेअर केली आणि एकच खळबळ उडाली. गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या भाऊराव यांच्या टीडीएम चित्रपटाची या क्षेत्रातील प्रस्थापितांनी गळचेपी केल्यानंतर भाऊराव अडचणीत आले होते. दुसरीकडे प्रेक्षकांनी हा सिनेमा मात्र डोक्यावर घेतला होता. त्यावेळी भाऊराव यांनी सोशल मीडियावर आपल्या डोळ्यातील अश्रुंसह कैफियत मांडली होती. प्रेक्षकांनी त्याला चांगला प्रतिसाद दिला होता. परंतु त्यानंतर या सिनेमाला स्क्रिन मिळत नसल्याचं समोर आलं होतं. हा सिनेमा पाहता येत नसल्यानं प्रेक्षकांची घोर निराशा झाली होती.

राष्ट्रीय पुरस्कार विजेते भाऊराव नानासाहेब कऱ्हाडे यांचा ख्वाडा सिनेमा खूप गाजला. बबन सिनेमाचीही चर्चा झाली. त्यानंतर त्यांचा टीडीएम हा सिनेमा आला. काही महिन्यांपूर्वी हा सिनेमा प्रदर्शित झाला. त्यांच्या सिनेमाची खास गोष्ट म्हणजे त्यांचा सिनेमा मातीतला असतो, मातीतल्या लोकांनी बनवलेला असतो. ग्लॅमरस चेहरे, लोकेशन्स असं काही नसताना त्यांच्या सिनेमांची नेहमीच चर्चा होताना दिसते. त्यांच्या या हटके सिनेमातल्या लव्हस्टोरी प्रेक्षकांना नेहमीच आवडल्या आहेत.

दरम्यान, भाऊराव कऱ्हाडे यांनी ख्वाडा, बबन यासारख्या अस्सल गावरान ढंगातील, रंगातील सिनेमा प्रेक्षकांसमोर आणत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

ख्वाडाच्या वेळीही विकली होती जमीन !

ख्वाडा हा भाऊराव यांचा पहिला चित्रपट या चित्रपटाच्या वेळी ही अनेक अडचणी आल्या, त्यावेळीही त्यांना स्वत:ची जमीन विकावी लागली होती. मात्र त्यानंतर ख्वाडा ला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले. अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांबरोबरच त्यावर राष्ट्रपती पुरस्काराची मोहोर उमटली. त्यानंतर आलेला बबनही सुपरहिट ठरला. त्यावेळी आर्थिक अडचणीतून बाहेर पडत भाऊरावांनी विकलेली जमीन परत घेतली. आताही जमिन विकू नका, अशी भावनिक साद घातलेल्या चाहत्यांना भाऊरावांनी आपण परत जमीन घेऊ, अशा शब्दांत दिलासा दिला आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरुन पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

वाचकांच्या लेखणीतून

समाज व पर्यावरण जोडणारा सेतू

ज्येष्ठ साहित्यिक फ्रान्सिस दिब्रिटो यांचे वसई येथे राहत्या घरी गेल्या २५ जुलै रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी निधन झाले आहे. ४ डिसेंबर १९४३ रोजी वटार गावी (वसई) त्यांचा जन्म झाला होता. त्यांचे मूळ नाव जॉन असे होते. ते नुसते साहित्यिकच नव्हते. त्यांनी हरित वसई पर्यावरण रक्षण समितीच्या माध्यमातून मोठे कार्य केले आहे. गुंडशाहीविरुद्धही लढा दिला. उस्मानाबाद (धाराशिव) येथे भरलेल्या ९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. त्यांच्या जाण्याने मराठी साहित्य आणि पर्यावरणवादी चळवळीचे मोठेच नुकसान झाले आहे.

त्यांनी पुणे विद्यापीठातून बी.ए. (समाजशास्त्र) आणि एम.ए. (धर्मशास्त्र) या पदव्या मिळविल्या. १९७२ साली कॅथॉलिक ख्रिस्ती धर्मपदाची दीक्षा घेतली.

ते धर्माने ख्रिस्ती असले तरी त्यांचा मराठी संतसाहित्याचा चांगलाच व्यासंग होता. वसईतील धार्मिक, साहित्यिक, सामाजिक विषयांना वाहून घेतलेल्या सुवार्ता या मासिकाचे त्यांनी संपादन (१९८३-२००७) केले होते.

त्यांची साहित्यसेवा वाखाणण्याजोगी आहे. मदर तेरेसा (चरित्र), नाही मी एकला (आत्मचरित्र), सुबोध बायबल (धार्मिक), ओॲसिसच्या शोधात (प्रवासवर्णन), तेजाची पाऊले (ललित), परिवर्तनासाठी धर्म (वैचारिक) आदी साहित्यसंपदा त्यांनी निर्माण केली. त्यांची लेखनशैली सुबोध आणि सहज आहे. तिच्यातून समाजोध्दाराचा भावनाप्रवाह आढळून येतो.

समाज व पर्यावरण जोडणारा सेतू आज आपल्यातून नाहीसा झाला आहे.

फूल मुरझाते हैं, अल्फ़ाज़ नहीं मुरझाते।
दूर जाना है, बुज़ुर्गों की दुआ लेते जाओ।।

शैदा रूमानी म्हणतात, फुले कोमेजतात. शब्द कोमेजत नाहीत. दूर जायचे आहे. वृध्द (महात्म्यांचे) आशीर्वाद घ्या. त्याप्रमाणे आज फादर फ्रान्सिस दिब्रिटो आपल्यात नसले तरी त्यांचे आदर्श विचार शिरोधार्य मानून आपण आपले जीवनमार्गक्रमण करीत राहूया. हीच त्यांना आपली श्रध्दांजली समजूया.

■ **नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.

जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
नोंदणी क्र. महा. ३९६/२२
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ऍडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक रोजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

उपनगराध्यक्षा जायदा शेख यांची संकल्पना

पारनेर : प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त उपनगराध्यक्षा जायदा शेख यांच्या संकल्पनेतून पारनेर शहरात विविध उपक्रम राबविण्यात आले.

युवा नेते राजू शेख यांच्यासह युवा सेना शहराध्यक्ष मनोज व्यवहारे, उपशहरप्रमुख संदीप मोढवे, ज्ञानेश्वर औटी, शंकर औटी, डॉ. सुरेश घोडके यांच्यासह शिवसैनिकांनी शहरातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येऊन पर्यावरणाचा संदेश देण्यात आला.

यावेळी बोलताना राजू शेख म्हणाले, शिवसेना पक्ष प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी वीस टक्के राजकारण व ऐंशी टक्के समाजकारण हे सुत्र ठरवून समाजातील सर्व घटकांसाठी काम केले. त्यांचाच आदर्श डोळयापुढे ठेउन शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे हे पक्षाचे नेतृत्व करीत असून त्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली शिवसेनेची संघटना राज्यात भक्कमपणे उभी आहे. युवा सेना प्रमुख आदीत्य ठाकरे यांनी देखील सामाजिक, राजकीय क्षेत्रात कामाच्या माध्यमातून ठसा उमटविला असून राज्यात मंत्री म्हणून काम करताना आदित्य ठाकरे यांनी आपली कुवत सिध्द केली आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काम करताना उध्दव ठाकरे यांनी केलेल्या कामाची जगभराने दखल घेतल्याचे शेख म्हणाले.

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना उध्दव ठाकरे यांनी समाजाभिमुख काम केले. कोरोना काळात त्यांनी केलेल्या कामाची दखल घेतली गेली. ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकार पक्ष फोडून पाडण्यात आले. त्यामुळे उध्दव ठाकरे व महायुतीविषयी जनतेमध्ये सहानुभूती असून त्याचीं प्रचिती लोकसभा निवडणूकीमध्ये आली आहे. आगामी विधानसभा निवडणूकीतही शिवसेना सर्वाधिक जागा जिंकेल आणि राज्यात पुन्हा महाविकास आघाडीचे सरकार भक्कमपणे सत्तेवर येईल.

जायदा शेख
उपनगराध्यक्ष, पारनेर नगरपंचायत

निघोजची ऐतिहासिक वेस कात टाकणार !

■ रविवारी ग्रामस्थांच्या बैठकीचे आयोजन ■ यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके यांची माहिती

निघोज : प्रतिनिधी

निघोजची ऐतिहासिक वेस शेकडो वर्षांपूर्वी बांधली असून याच ठिकाणी ही वेस पुन्हा बांधण्याचा निर्णय गावकऱ्यांनी लोकसहभागातून घेतला असून वेस बांधण्याचे काम वेगाने सुरू होण्यासाठी रविवार दि.२८ रोजी मळगंगा मंदिरात सकाळी ९ वाजता ग्रामस्थ बैठकीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मळगंगा यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके यांनी दिली.

■ निघोज येथील नव्याने बांधण्यात येणाऱ्या प्रवेशद्वाराचे संकल्पचित्र.

या बैठकीला निघोज ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ, विविध सामाजिक संस्था, सहकारी संस्था यांचे पदाधिकारी व संचालक मंडळ तसेच उद्योग समूह, व्यावसायीक , व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित राहाणार आहेत.

निघोज येथील मारुती मंदिरासमोरील वेस (प्रवेशद्वार) गेली शेकडो वर्षांपूर्वी बांधण्यात आली आहे या वेस (प्रवेशद्वार) महत्व ऐतिहासिक आहे. मात्र जुन्या दगडांच्या सहाय्याने बांधण्यात आलेले हे बांधकाम मजबूत असले तरी यामध्ये महत्वपूर्ण बदल करीत हे प्रवेशद्वार नव्याने पुन्हा बांधण्याचा निर्णय यात्रा उत्सव कमिटी बैठकीत घेण्यात आला होता. त्यानुसार ही बैठक रविवारी आयोजित करण्यात आली आहे.

हे प्रवेशद्वार नव्याने उभे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च येणार असून लोकसहभागातून होणाऱ्या या कामाचे नियोजन करण्यासाठी ही बैठक आयोजित केली असून ग्रामस्थांनी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन लंके व त्यांच्या सहकाऱ्यांनी तसेच ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांनी केले आहे.

जाधववाडी / राऊतवाडी सेवा संस्थेवर खा.लंके गटाचे वर्चस्व !

चेअरमनपदी सुदाम जाधव तर व्हा.चेअरमनपदी चंद्रभागा जाधव यांची बिनविरोध निवड

पारनेर : प्रतिनिधी

तालुक्यातील जाधववाडी/राऊतवाडी सेवा संस्थेवर खा.नीलेश लंके गटाने निर्विवाद वर्चस्व मिळविले असून जाधववाडीचे माजी सरपंच सुदाम पांडुरंग जाधव यांची चेअरमनपदी तर व्हा.चेअरमनपदी चंद्रभागा बन्सी जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे .

■ जाधव वाडी /राऊतवाडी सोसायटीच्या चेअरमन व व्हाईस चेअरमनपदी सुदाम जाधव तर चंद्रभागा जाधव यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल खा. नीलेश लंके यांच्या संपर्क कार्यालयात सत्कार करण्यात आला.

शुक्रवारी पार पडलेल्या जाधववाडी राऊतवाडी सेवा सोसायटीचे सदस्य संचालक व ग्रामस्थांच्या उपस्थितीत झालेल्या या निवडीमध्ये एकमताने चेअरमन व व्हा. चेअरमन यांची निवड करण्यात आली . सदर निवड प्रक्रियेत निवडणूक अधिकारी श्री थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव दत्ता पतके यांच्या व संचालक मंडळाच्या उपस्थितीत या निवडी करण्यात आल्या.

यावेळी संचालक तुकाराम अवचिते ,धोर्डींबा भागाजी जाधव ,घमाजी गंगाराम सोमवंशी ,यशवंत उमाजी जाधव ,भाऊसाहेब राऊत , अशोक राऊत ,हनुमंत राऊत , लक्ष्मण राऊत ,नंदा बाळासाहेब राऊत ,रावसाहेब जाधव ग्रामस्थांपैकी माजी सरपंच संतोष तुकाराम जाधव मा.सरपंच साळुबाई पोपट जाधव मा.सरपंच पोपट घमाजी सोमवंशी,सरपंच पोपट लक्ष्मण जाधव, बबन नारायण सोमवंशी ,अनंथा सोमवंशी, नाथा जाधव ,लहु जाधव, बन्सी महाराज,बाबा जाधव,रोहीणी सोमवंशी ,वसंत जाधव, बबन जाधव,नामदेव जाधव ,शिवाजी राऊत ,राजू राऊत आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

अलका पवार यांचे निधन

जुन्या पिढीतील व्यक्तिमत्व हरपले

सुपा : प्रतिनिधी

तालुक्यातील सुपे येथील जुन्या पिढीतील व्यक्तिमत्व सौ. अलका विनायक पवार यांचे नुकतेच दिर्घ आजाराने निधन झाले. त्या ६८ वर्षांच्या होत्या. सुप्याचे माजी सरपंच तथा बाजार समितीचे संचालक विजय पवार यांच्या त्या मातोश्री होत.

गेल्या दोन वर्षांपासून स्व. अलका या अर्धांगवायूच्या आजाराशी सामना करत होत्या. याच आजारात त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, पुतणे, नातवंडे असा मोठा परिवार आहे. सुप्याचे मा. सरपंच तथा बाजार समितीचे संचालक विजय पवार, इंजिनिअर प्रकाश पवार यांच्या त्या मातोश्री तर माजी ग्रामपंचायत सदस्य, विद्यमान दुध संस्थेचे चेअरमन विनायक पवार यांच्या पत्नी तर मा. ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब पवार यांच्या चुलती होत.

भोरवाडीतील भोर कुटूंबातून पवार कुटूंबात दाखल झालेल्या अलकाताई यांनी पती विनायक यांना खंबीर साथ देत दोन मुले व एका मुलीवर चांगले संस्कार करण्यात पुढाकार घेतला. तिनही मुले आपल्या क्षेत्रात आज यशस्वी वाटचाल करीत आहेत. भोर कुटूंबातील बेताच्या परिस्थितीची जाण असल्याने सासरी आल्यानंतरही स्व. अलका यांनी आपला संसार सचोटीने केला. पती विनायक, मुलगा विजय हे सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करताना अलका यांनी त्यांना खंबीर साथ दिली. जनतेने पदावर काम करण्याची संधी दिल्यानंतर त्या संधीचे सोने करून जनतेने टाकलेला विश्वास सार्थ ठरवावा हा कानमंत्र त्या नेहमी देत. त्यामुळेच मुलगा विजय यांना बाजार समितीचे संचालक म्हणून दुसऱ्यांना संधी मिळाली.

सुप्यातील अमरधामध्ये स्व. पवार यांच्यावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ उपस्थित होते.

उद्धव ठाकरे हे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत ही जनतेची इच्छा

■ डॉ.भास्करराव शिरोळे यांचे प्रतिपादन ■ वाढदिवसानिमित्त अळकुटीत वृक्षारोपण

अळकुटी : प्रतिनिधी

माजी मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत ही जनतेची इच्छा असून विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी सत्तेवर येणार असून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होतील असा विश्वास शिवसेना नेते डॉ. भास्करराव शिरोळे यांनी व्यक्त केला.

माजी मुख्यमंत्री व शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस शनिवार दि.२७ रोजी अळकुटी येथे वृक्षारोपण करुन साजरा करण्यात आला. यावेळी वनस्पती औषधी पासष्ट ऑक्सिजन निर्मिती करणारे मोहगणी झाडे लावण्यात आली. या झाडांच्या संगोपणाची जबाबदारी नित्यसेवा प्रतिष्ठानच्या पदाधिकारी व सदस्य यांनी घेतली आहे.यावेळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आले.

■ माजी मुख्यमंत्री व शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त अळकुटी येथे पासष्ट ऑक्सिजन निर्मिती करणारे मोहगणी झाडे लावण्यात आली.

यावेळी माजी सरपंच व तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष बाबाजी भंडारी , शिवसेनेचे विभागप्रमुख सखाराम उजगरे, उपसरपंच बाळासाहेब धोत्रे, माजी चेअरमन बाळासाहेब पुंडे, खंडोबा देवस्थान उपाध्यक्ष महेश शिरोळे, माजी उपसरपंच अरिफ पटेल, माजी उपसरपंच शरद घोलप, शिवसेना शाखा प्रमुख अशोक शिरोळे, सेवा सोसायटी संचालक सुभाष भोसले, ग्रामपंचायत सदस्य बाजीराव शिरोळे, जैन समाजाचे तालुका सचिव व युवा नेते सचिन साखला, ज्येष्ठ नेते संजय मते, जालिंदर घोलप, किसन घोलप, ज्ञानदेव घोलप, श्रीपत शिरोळे, सुभाष औटी, सहादू भंडारी, भगवंता पुंडे, दिलीप शिरोळे, उद्योजक भास्करराव जाधव, गोरक्ष जाधव, मुख्याध्यापक संजीवण पावडे, उत्तमराव शिंदे, कांता फापाळे, मीरा शिरोळे, हिराबाई लटांबळे, संजय दुधाडे, योगिता काटे, आशाबाई लाळगे, दिपाली राऊत, सदाशिव कळंबे, अनिल पुंडे, ज्योती बेलकर, दत्ता परंडवाल, बबनराव शिरोळे, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉक्टर शिरोळे यावेळी म्हणाले गेली साडेचार वर्षांपूर्वी महाविकास आघाडीच्या माध्यमातून ठाकरे यांना मुख्यमंत्री पदाची संधी मिळाली दोन ते अडीच वर्षांच्या कार्यकाळात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी लोकहिताचे निर्णय घेतले कोरोनाचा काळ असतानाही विकासकामे मोठ्या प्रमाणात झाली तसेच जनतेला आरोग्य सेवा देत कोरोनावर मोठ्या प्रमाणात मात करण्याचे काम राज्य सरकारने केले. कोरोना काळात देशात एक नंबरचे काम राज्य सरकारने केले असून मुख्यमंत्री ठाकरे यांचे देशात कौतुक झाले आहे.

मुख्यमंत्री झाल्यानंतर मंत्रीमंडळाच्या पहिल्याच बैठकीत ठाकरे यांनी शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफी जाहीर करीत व प्रत्यक्ष अंमलबजावणी करीत शेतकरी हिताचा निर्णय घेतला.

सक्षम मुख्यमंत्री म्हणून ठाकरे यांची कारकीर्द आजही जनतेच्या स्मरणात असल्याने पुन्हा ठाकरे हेच मुख्यमंत्री व्हावेत ही जनतेची ईच्छा असून महायुती सरकारने जनतेच्या आशा अपेक्षा धुळीस मिळवल्या असून विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येऊन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होतील अशी खात्री डॉ. शिरोळे यांनी व्यक्त केली आहे.

नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रगती साधावी

अध्यक्ष धरमचंद फुलफगर यांचे प्रतिपादन । विद्याधाम प्रशालेत गुणगौरव सोहळा संपन्न

शिरुर : प्रतिनिधी

स्पर्धेच्या युगात आपले ध्येय आजच ठरवून घ्यावे.प्रत्येक पालक मुलांना घडविण्यासाठी प्रयत्नशील आहे. शिक्षकांनी शैक्षणिक गुणवत्ता आणि दर्जा राखण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजे.शिक्षक आणि पालक यांनी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रगती करावी असे मत विधाधाम प्रशाला शालेय समितीचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर यांनी व्यक्त केले.

येथील प्रशालेच्या सभागृहात गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्यात फुलफगर बोलत होते. स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली या अगोदर जैनम जैन या विद्यार्थिनीने करिअर विषयी मार्गदर्शन केले.या वर्षी प्रथमच शालेय समितीचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर यांचे संकल्पनेतून आणि सौजन्यातुन प्रशालेतील शिष्यवृत्ती गुणवंत यादी मध्ये व इतर विभागात चमकलेल्या विद्यार्थी आणि शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

या वेळी शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य प्रकाश बाफना,चंदुलाल चोरडिया,राजेंद्र दुगड,शिरिष बरमेचा,मोहन गादिया,राजेंद्र भटेवरा शिरूर तालुका मुख्याध्यापक संघटनेचे सचिव मारुती कदम,मुख्याध्यापक संजय शेळके,उपमुख्याध्यापक गुरुदत्त पाचर्णे,शिक्षकपालक संघाचे उपाध्यक्ष रावसाहेब चक्रे,संचालक ह.भ.प.संभाजी दरोडे,राजेंद्र बनकर,संध्या औटी,अर्चना तांबे,दत्ता इथापे यांचे हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

विद्याधाम प्रशालेची गौरवशाली परंपरा कायम टिकवून आहे. सन २०२३-२४ मध्ये शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत प्रशालेचे ५० विद्यार्थी चमकले.तसेच इयत्ता दहावी,बारावी,कला-क्रीडा या विभागात यश मिळविणऱ्या एकूण १४९ विद्यार्थी व शिक्षकांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य प्रकाश बाफना म्हणाले प्रशालेच्या जडण घडणीत शिक्षकांचे योगदान महत्वाचे आहे. पुणे जिल्हा आणि पिंपरी चिंचवड या शाळेच्या तुलनेत विद्याधाम प्रशाला प्रथम क्रमांकावर राहिली आहे.शिक्षक हाच प्रशालेचा कणा आहे.घड्याळ बघून शिक्षकांनी काम करू नये तर विद्यार्थ्यांसाठी झोकून द्यावे असे बाफना म्हणाले.

यावेळी विधाधाम प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका ज्योती मुळे,आर.एम.डी,इंग्लिश मेडियम च्या प्राचार्य अश्विनी घारू,पर्यवेक्षक दिगंबर नाईक, मच्छिंद्र बनकर, चंद्रकांत देविकर, सचिन रासकर,दीपक बनकर,जयश्री गवंड उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संजय शेळके यांनी केले,सूत्रसंचालन दिपक गुजर तर संजय देशपांडे यांनी आभार मानले.

डी.बी.एम स्कूल मध्ये कारगिल शहीद जवानांना भावपूर्ण मानवंदना

वीरत्व आणि बलिदानाच्या गाथेचे सादरीकरण

राळेगण सिद्धी : प्रतिनिधी

कारगिल विजय दिनानिमित्त येथील डी.बी.एम.स्कूलमध्ये कारगिल युद्धातील शहीद जवानांना मानवंदना देण्यासाठी एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली, ज्यात सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

यावेळी कु.भाग्यश्री शिर्के हिने शहीद जवान कॅप्टन विक्रम बत्रा यांची माहिती अत्यंत प्रेरणादायक गोष्टीच्या रूपात सादर केली. तिच्या गोष्टीतून विद्यार्थ्यांना कॅप्टन बत्रा यांची वीरता आणि देशप्रेमाची माहिती मिळाली. यानंतर, शहीद कॅप्टन विक्रम बत्रा यांचा शेवटचा संदेश विद्यार्थ्यांना ऑडिओ स्वरूपात ऐकवण्यात आला, ज्याने सर्वांचे मन भरून आले.

कार्यक्रमात कारगिल युद्धातील सर्व शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमासाठी लाभलेले प्रमुख पाहुणे मेजर ज्ञानेश्वर मापारी (माऊली मेजर) यांनी विद्यार्थ्यांना कारगिल युद्धाची चित्तथरारक कहाणी सांगितली. त्यांनी युद्धाच्या विविध पैलूंचे वर्णन केले आणि विद्यार्थ्यांना सैनिकांच्या बलिदानाची जाणीव करून दिली. यासोबतच त्यांनी विद्यार्थ्यांना सैन्यभरतीसाठी मार्गदर्शन केले, ज्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या मनात सैन्यदलात भरती होण्याची इच्छा निर्माण झाली.

विद्यालयाचे प्राचार्य जे.डी. मापारी सर यांनी कारगिल विजय दिवसाचे महत्त्व विशद करताना नमूद केले की, आपल्या वीर सैनिकांनी देशासाठी दिलेले बलिदान आणि त्याग अमूल्य आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना देशाचा आणि तिरंग्याचा अभिमान बाळगण्याचे, सैनिकांचा सन्मान करण्याचे आणि देशाप्रती असणाऱ्या कर्तव्याचे पालन करण्याचे आवाहन केले. मापारी सर म्हणाले, ''आपल्या सैनिकांनी दाखवलेल्या अतुलनीय धैर्यामुळे आज आपण सुरक्षित आहोत. त्यांच्या शौर्याची गाथा प्रत्येक भारतीयाच्या हृदयात कायम रहावी, असे माझे मनापासून आवाहन आहे.'' कार्यक्रमाच्या शेवटी धनश्री रोकडे यांनी ये मेरे वतन के लोगो हे देशभक्तीपर गीत सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या गीताने देशप्रेमाची भावना प्रत्येकाच्या हृदयात खोलवर रुजवली. एक अनोखी स्फूर्ती आणि उत्साह निर्माण केला.कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे जयसिंग मापारी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्री.जाधव सर यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन करण्यात जे.डी. मापारी सर व मापारी मॅडम यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

गावच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध

सरपंच सोमनाथ आहेर यांचे प्रतिपादन । सामाजिक धार्मिक उपक्रमांनी सरपंच सोमनाथ आहेर यांचा वाढदिवस साजरा

मांडवे : प्रतिनिधी

तालुक्याच्या उत्तर टोकाला असलेले मांडवे खुर्द गाव हे मुळा नदीच्या तीरावर वसले आहे. गावच्या सर्वांगीण विकासासाठी यापुढील काळात काम करत राहणार आहे. खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त विकासात्मक निधी गावाला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. सर्वसामान्य गोरगरिबांचे प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे मत आपल्या वाढदिवसाच्या दिवशी सरपंच सोमनाथ आहेर यांनी व्यक्त केले.

पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द गावचे आदर्श सरपंच सोमनाथ आहेर यांचा वाढदिवस सोमवार दि. २२ जुलै रोजी विविध सामाजिक धार्मिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्ताने सरपंच सोमनाथ आहेर यांनी लोकाभिमुख सामाजिक उपक्रम राबविले. यावेळी त्यांना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

मांडवे खुर्द येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गावातील अनेक तरुण युवकांनी रक्तदान शिबिरामध्ये सहभाग घेतला. आरोग्य क्षेत्रामध्ये रक्ताचा असलेला तुटवडा लक्षात घेऊन रक्तदान शिबिराचे आयोजन सरपंच आहेर यांनी केले होते. तसेच संध्याकाळी मांडवे खुर्द येथेच धार्मिक कार्यक्रम म्हणून जेऊर हैबती येथील विनोदाचार्य समाज प्रबोधनकार ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज तांबे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते.

सरपंच सोमनाथ आहेर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी खासदार नीलेश लंके यांचे ज्येष्ठ बंधू दीपक लंके, म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे, पळशीचे सरपंच प्रकाश राठोड, टाकळी ढोकेश्वरचे उपसरपंच रामभाऊ तराळ, नीलेश लंके प्रतिष्ठानचे युवक सचिव अमोल उगले, उद्योजक दत्तात्रय साळुंके, भोंद्रे सरपंच अभिजीत झावरे, तिखोलचे माजी सरपंच अनिल तांबडे, पोखरी सरपंच सतीश पवार, पोखरी उपसरपंच बाळासाहेब शिंदे, देसवडे सरपंच पोपट दरेकर, देसवडे उपसरपंच सचिन भोर, खडकवाडी येथून सामाजिक कार्यकर्ते अमोल रोकडे, प्रगतिशील शेतकरी विकास रोकडे, राष्ट्रवादीचे नेते श्रीरंग रोकडे, गणेश चौधरी, सारंग रोकडे तसेच देसवडे येथून चेअरमन संतोष टेकुडे, माजी सरपंच बाबासाहेब भोर, चेअरमन संजय भोर, पारनेर येथील कार्यकारी अभियंता कानिटकर साहेब, डेप्युटी इंजिनियर जाधव साहेब, मांडवे खुर्द उपसरपंच मनीषा जाधव, उद्योजक श्रीरंग हारदे आदी मान्यवर तसेच सरपंच सोमनाथ आहेर मित्रपरिवार यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होता.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com